# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.६

सभावृत्तांत

दिनांक ०५/०८/२०१६ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे ऑगस्ट २०१६ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५/०८/२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. टाक अरुण मदन | सभापती |
| २. | मा. पाडाळे निता विलास | सदस्या |
| ३. | मा. श्री. नढे विनोद जयवंत | सदस्य |
| ४. | मा. तापकीर अनिता मच्छिंद्र | सदस्या |
| ५. | मा. चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ६. | मा. श्री. बोकड रामदास गेणभाऊ | सदस्य |
| ७. | मा. श्रीमती जवळकर वैशाली राहुल | सदस्या |
| ८. | मा. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |
| ९. | | |

याशिवाय खालील प्रमाणे नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते.

१. मा. धनंजय गणपत मोहिते

------------------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रीय अधिकारी, मा. सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा.प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, मा. नितीन देशमुख ,उपअभियंता तथा प्रभारी कार्यकारी अभियंता विद्युत, मा. सुरेश आव्हाळे, लेखाधिकारी, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. विनय ओहोळ, मा. पाटील एस. वाय.,मा. शिरीष पोरेडी, उपअभियंता, स्थापत्य,मा. रामनाथ टकले, मा. विजयसिंह भोसले, उपअभियंता ,बांधकाम परवानगी, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. राजेंद्र इंगळे, उपअभियंता, झोनिपू, मा. ए.जी. जाधव, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा.व्हि.एस.गेंगजे, क्रीडा निरीक्षक, मा.ए.ए. मोमीन,मा. एस.एच. लोखंडे, मा.वर्षा कदम, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. वाकोडे ए.एस.,मा. रोकडे जयवंत, मा. इदे, ए.के. मा. मुलाणी बी.एम. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. मुठाळ, मा. संजय चव्हाण,

मा. आर.बी. जगताप, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. पाडवी व्ही.ए., मा. भालेराव यु.ए. कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. अतुल सोनवणे, मा. सरोदे वसंत, आरोग्य निरीक्षक, मा. अमर मद्रासी, मलेरिया निरीक्षक, मा. एस.डी. माळी, आरोग्य निरीक्षक, पशू वैद्यकीय विभाग, मा.बैचे डी.के., हॉर्टीकल्चर सुपरवायझर, उद्यान विभाग, मा. सुनिल दुदुसकर, सटाले, उद्यान सहाय्यक, मा. मोहन कदम, मा. एम.पी. सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सभापती** : सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

**मा. क्रीडा पर्यवेक्षक श्री. गेंगजे** : ड प्रभाग कार्यालयाचे प्रशासन अधिकारी पदी श्री. सीताराम बहुरे यांची नियुक्ती झाली असुन त्यांचे सर्व पदाधिकारी व अधिकारी कर्मचारी यांचे वतीने ड क्षेत्रीय कार्यालयात स्वागत करतो.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सर्व उपस्थित पदाधिकारी व अधिकारी यांचे आभार मानुन आजच्या सभेचे कामकाज सुरु करुन सभेत सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

सन्मा. सदस्य यांच्या मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १ :** प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव स.नं. २३/३ येथे साधारण २०० नागरीकांची वस्ती असुन या ठिकाणी जास्तीत जास्त नवले कुटुंबिय वास्तव्य करीत असलेने सदर स.नं. हा नवले परिवाराच्या वहिवटीची असल्यामुळे ते या परिसरातील स्थानिक रहिवाशी असुन सदर परिसरास “नवले कॉलनी” नाव देणेबाबत

**विषय क्र. २** : प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या ६५० आसनाच्या क्षमतेचे नाटयगृहास “नटसम्राट निळू फुले रंगमंदिर” असे नाव देणेबाबत

**विषय क्र.** ३ : प्रभाग क्र. ४३ येथील रिव्हर रोड परिसरात जमाते इशाअतुल उलुम नावे मस्जिद असुन सदर मस्जिदीकडे जाणा-या रस्त्यास “जमाते इशाअतुल उलुम रस्ता” असे नामकरण करणे तसेच तेथे तसा नामफलक महापालिकेकडून लावणेबाबत

**विषय क्र.** ४ : प्रभाग क्र. **५७** पिंपळे गुरव एचडीएफसी चौक (एम.के. हॉटेल चौक) येथील मिलिटरी हद्दीच्या भिंतीच्या कडेला असलेल्या पुरुष व महिलांसाठी असलेल्या सार्वजनिक मुतारीची दुर्गंधी या भागातील नागरीकांना येत असल्यामुळे तसेच त्याचा वापर कमी असल्यामुळे सदर मुतारी पाडून त्या जागेत ज्येष्ठ नागरीकांना बसण्यासाठी खुर्च्या व वाचनालय तयार करण्याबाबत

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे ऑगस्ट २०१६ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. सचिव, सभा शाखा** : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ५ माहे जुलै २०१६ च्या मासिक सभेच्या दिनांक १/०७/२०१६ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील कार्यपत्रिका क्र. ५ माहे जुलै २०१६ चा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

माहे ऑगस्ट २०१६ च्या कार्यपत्रिका क्र. ६ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र.१५

दिनांक ५/८/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

संदर्भ : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर यांचेकडील दि. १७/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४७ मधील सर्व्हे नं. ७३/२ई/१५ मधील साईसदन अपार्टमेंट व मयुर रेसिडेन्सी यामध्ये ९ मीटरपेक्षा अंतर जास्त असल्यामुळे कलम ३७ अंतर्गत रस्ता हलवणेचा प्रस्ताव सदर ठिकाणी रस्त्याचे रुंदीकरण या पूर्वीच करण्यात आले असलेने व नगररचना विभागाकडून याबाबतची सविस्तर माहिती मिळालेली नसल्याने तहकुब करण्यात येत आहे.

--------------

विषय क्र. २ ठराव क्र.१६

दिनांक ५/८/२०१६ विभाग: आरोग्य विभाग

संदर्भ : मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील प्रस्ताव क्र. डक्षे/०७/कावि/५४४/२०१६ दि. २८/७/२०१६

केंद्र शासनाने देशातील सर्व शहरातील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ भारत अभियान (नागरी ) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पूर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने ड क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ४६ विजयनगर हा प्रभाग हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषीत करणेबाबतच्या मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------------

**मा. सचिव, सभा शाखा** : सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने दिनांक ५/८/२०१६ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. ३ ठराव क्र. १७

दिनांक ५/८/२०१६ विभाग: स्थापत्य

सूचक : मा.राजेंद्र गणपतराव जगताप अनुमोदक : मा. विनोद जयवंत नढे

संदर्भ : मा. राजेंद्र गणपतराव जगताप यांचेकडील दि. ०५/०८/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव स.नं. २३/३ येथे साधारण २०० नागरीकांची वस्ती असुन या ठिकाणी जास्तीत जास्त नवले कुटुंबिय वास्तव्य करीत असलेने सदर स.नं. हा नवले परिवाराच्या वहिवटीची असल्यामुळे ते या परिसरातील स्थानिक रहिवाशी असुन सदर परिसरास "नवले कॉलनी" नाव देणेबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. ४ ठराव क्र. १८

दिनांक ५/८/२०१६ विभाग: स्थापत्य

सूचक : मा.राजेंद्र गणपतराव जगताप अनुमोदक : मा. विनोद जयवंत नढे

संदर्भ : मा. राजेंद्र गणपतराव जगताप यांचेकडील दि. ०५/०८/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या ६५० आसनाच्या क्षमतेचे नाटयगृहास "नटसम्राट निळू फुले रंगमंदिर" असे नाव देणेबाबतचे प्रस्तावावर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. ५ ठराव क्र. १९

दिनांक ५/८/२०१६ विभाग: स्थापत्य

सूचक : मा.अरुण मदन टाक अनुमोदक : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर

संदर्भ : मा. अरुण मदन टाक यांचेकडील दि. ०५/०८/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४३ येथील रिव्हर रोड परिसरात जमाते इशाअतुल उलुम नावे मस्जिद असुन सदर मस्जिदीकडे जाणा-या रस्त्यास "जमाते इशाअतुल उलुम रस्ता" असे नामकरण करणे तसेच तेथे तसा नामफलक महापालिकेकडून लावणेबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

---------------------

विषय क्र. ६ ठराव क्र. २०

दिनांक ५/८/२०१६ विभाग: स्थापत्य

सूचक : मा.राजेंद्र गणपतराव जगताप अनुमोदक : मा. विनोद जयवंत नढे

संदर्भ : मा. राजेंद्र गणपतराव जगताप यांचेकडील दि. ०५/०८/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव एचडीएफसी चौक (एम.के. हॉटेल चौक) येथील मिलिटरी हद्दीच्या भिंतीच्या कडेला असलेल्या पुरुष वमहिलांसाठी असलेल्या सार्वजनिक मुतारीची दुर्गंधी या भागातील नागरीकांना येत असल्यामुळे तसेच त्याचा वापर कमी असल्यामुळे सदर मुतारी पाडून त्या जागेत ज्येष्ठ नागरीकांना बसण्यासाठी खुर्च्या व वाचनालय तयार करण्याबाबतचे प्रस्तावावर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

---------------------

यानंतर मा. सभापती यांचे मान्यतेने सन्मा. नगरसदस्य यांनी विविध विभागांचे कामकाजास अनुसरुन खालील प्रमाणे मत व्यक्त केले.

**आरोग्य विभाग** :

**मा. वैशाली राहुल जवळकर** : घरोघरचा कचरा उचलणेच्या कामाचा या आर्थिक वर्षाचा ठेका कोणास देणेत आला आहे व पूर्वीच्या ठेकेदारास काम देणेत आले आहे का? याबाबत प्रशासनाकडून खुलासा व्हावा. प्रभाग क्र. ५६ येथील गजाननगर या परिसरात काम करणारे कर्मचारी यांचे वर्तनात सुधारणा नाही. तेथील नागरीकांच्या घरातुन कचरा घेणेत येत नाही.

**मा. सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे** : सर्व प्रभागातील कच-याचे प्रायमरी व सेकंडरी असे दोन ठेकेदारांची नेमणुक करणेबाबत ठरले आहे. अ,ड ,फ क्षेत्रीय कार्यालयामध्ये ज्या पध्दतीने काम देणेत आले आहे त्याप्रमाणे ड प्रभागात कार्यवाही करण्यात येणार आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सध्याचे ठेकेदारास काम देणेत आले आहे. प्रभाग क्र. ५६ मध्ये कार्यरत कर्मचारी यांना सूचना देणेत येत आहेत.

**मा. निता विलास पाडाळे** : अयोध्यानगर येथील कचरा गोळा करणारे कर्मचारी यांचे काम व्यवस्थित नाही. क्रांतीवीर कॉलनी येथील झाडूवाली महिला कर्मचारी यांचे कामात अनियमितता आहे. सहयोग कॉलनी मागील गुरुकृपा कॉलनी येथे कच-याचा निपटारा झालेला नाही. कृष्णवाटिका सोसायटी येथे कचरा रस्त्यावर टाकला जातो. फॉगींगचे काम व्यवस्थित नाही. औषध फवारणीचे कामासाठी पुरेसे मनुष्यबळ नाही.

**मा. सहा. आरोग्याधिकारी** : फॉगींगचे काम पाऊस सुरु असताना करता येत नाही. औषध फवारणीसाठी मनुष्यबळ वाढविण्यात येईल.

**मा. रामदास बोकड** : कचरा गाडयांचे नियोजन व्यवस्थित नाही . सृष्टी चौक येथील कचराकुंडी हलविणेबाबत सांगितले होते परंतु त्याबाबत व्यवस्थित कार्यवाही केलेली नाही.

**मा. राजेंद्र जगताप** : कच-याची परिस्थिती वाईट आहे.

**मा. सहा. आरोग्याधिकारी** : ड प्रभागासाठी दोन कॉंपॅक्टरची सुविधा उपलब्ध झाली आहे. पुढील १५ दिवसात परिस्थितीत फरक पडेल.

**स्थापत्य विभाग** :

**मा. निता विलास पाडाळे** - राजवाडेनगर येथील स्टॉर्म वॉटर लाईन साफ केलेल्या नाहीत. तेथे स्टॉर्म वॉटर लाईनच्या वरुन पाणी जाते व पाणी नागरीकांच्या घरात जात आहे. तेथील संपूर्ण परिसरात अनारोग्य स्थिती निर्माण होत आहे. जगदाळे हॉस्पिटल शेजारील गुप्ता यांचे दुकानाजवळ गेले दोन वर्षापासुन खड्डा असुन तेथे पाणी साचते. तसेच साईकिरण, साईश्रध्दा कॉलनी येथे पाणी साचते त्याबाबत स्थापत्य विभागाकडून कार्यवाही करण्यात यावी.

**मा. कार्यकारी अभियंता श्री. ओंभासे** : जगदाळे हॉस्पिटलजवळील गुप्ता यांचे दुकानाशेजारील खड्डा बुजविणेची कार्यवाही करण्यात येईल.

**मा. लोखंडे कनिष्ठ अभियंता स्थापत्य** : सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

**बांधकाम परवानगी विभाग** :

**मा. विनोद नढे** : जगदाळे हॉस्पिटल येथील साचणा-या पाण्याबाबत बांधकाम परवानगी विभागाकडून संबंधितांना नोटीस देणेत आली आहे . स्थापत्य विभाग व आरोगय विभागाकडून तेथे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**मा.सहा. आरोग्याधिकारी** : बांधकाम परवानगी विभागाकडून तेथे कारवाई करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : सदर ठिकाणी बांधकाम परवानगी विभागाचे उपअभियंता, कार्यकारी अभियंता स्थापत्य, सहा. आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग व क्षेत्रीय अधिकारी यांनी एकत्रित स्थळ पाहणी करुन आवश्यक कार्यवाही करावी.

**मा. राजेंद्र जगताप** : आरक्षणाच्या जागेवरील बांधकामे हटविणे आवश्यक आहे. प्र.क्र. ५६ मध्ये आरक्षणाच्या जागेवर बांधकाम केलेले आहे. तसेच विकास आराखडा २०१६ तयार करण्याची कार्यवाही कोणत्या स्टेजला आहे याची माहिती मिळावी. महापालिकेच्या ज्या मिळकती आहेत त्यापैकी ड प्रभागात येणा-या व्यायामशाळा, बॅडमिंटन हॉल इ. जागा भाडे तत्वाने देणेबाबत काय निर्णय घेणेत आला आहे, दर कसे निश्चित करण्यात येतात याची माहिती नाही. क्षेत्रीय अधिकारी यांनी सदर विषय विभागप्रमुखांचे बैठकीत मांडावा.

**मा. कनिष्ठ अभियंता नगररचना श्री. मुठाळ** : सदर कामाचे आदेश देणेची कार्यवाही सुरु आहे.

**मा. सहा. आरोग्याधिकारी** : नवीन विकास आराखडयात कचरा संकलन केंद्रासाठी जागा आरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

**मा. उपअभियंता. बांधकाम परवानगी श्री. भोसले** : काही बांधकामे २० वर्षापूर्वीची आहेत त्यांचेवर कारवाई करताना अडचणी आहेत. पावसाळयानंतर कारवाई करण्यात येईल.

**मा. अनिता मच्छिंद्र तापकीर** : सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांचे प्रभाग क्र. ४८ मधील कामाबाबत अभिनंदन करते.

**पाणीपुरवठा विभाग** :

**मा. आरती चोंधे** : ऍपल हॉस्पिटल शेजारच्या लोकांची पाण्याचे प्रेशर कमी असल्याबाबत तक्रार आहे.

**मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा** : सदर ठिकाणी संबंधित उपअभियंता यांनी समक्ष पाहणी करण्याच्या सूचना देणेत येतील.

**मा. निता विलास पाडाळे** : फिनोलेक्स कॉलनी येथे पाण्याचे प्रेशर कमी आहे. तेथे लवकरात लवकर पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु करावे. इंद्रप्रस्थ कॉलनी, शांती कॉलनी, इंडियन महाराष्ट्र कॉलनी येथे पाण्याचे प्रेशर कमी आहे. इंद्रप्रस्थ कॉलनी येथे चोक अपचा प्रश्न आहे.

**मा. उपअभियंता, पाणीपुरवठा साबळे** : सदर ठिकाणी पाहणी करणेत येईल.

**पशूवैद्यकीय विभाग** :

**मा. राजेंद्र जगताप** : पशूवैद्यकीय अधिकारी बैठकीस उपस्थित राहत नाहीत. पिंपळे गुरव येथे कुत्र्यांचा प्रादुर्भाव फार आहे. पशुवैद्यकीय विभागाकडून गाडी वेळेत पाठविणेत येत नाही.

मा. सभापती :- सर्व उपस्थित अधिकारी यांनी सन्मा. नगरसदस्य यांनी दिलेल्या सूचनांनवर आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सूचना देऊन, सर्व सन्मा. नगरसदस्य व अधिकारी वर्ग यांचे आभार मानुन माहे ऑगस्ट २०१६ ची बैठक संपलेचे जाहीर करतो.

सही/-

( अरुण मदन टाक )

**सभापती**

ड प्रभाग समिती, ड क्षेत्रीय कार्यालय,
रहाटणी - १७

सही/-

( सीताराम बहुरे )

**प्रशासन अधिकारी तथा**

सचिव (सभाशाखा)

ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/२६६/२०१६

दिनांक –०९/०८/२०१६